**प्रेसनोट दि. ०९.०८.२०२१**

**श्री. बाबासो महादेव जाधव**, वय ३८ वर्ष,पद-**लेखाधिकारी** (वर्ग-२), रा.वडणगे, ता.करवीर, जि.कोल्हापूर व **बबन रामचंद्र कोळी**, वय ५७ वर्षे,पद-**कनिष्ठ लेखापरिक्षक**, लेखाधिकारी लेखा परिक्षण पथक,शिक्षण विभाग सांगली., रा.इनामधामणी, ता.मिरज, जि.सांगली. यांना ५,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांची निवडश्रेणी पडताळणी स्टॅम्पीगसाठी व त्यांचे सहकारी मित्र यांचे वरिष्ठ वेतनश्रेणी पडताळणी व स्टॅम्पीग करुन मिळणेसाठीचा अर्ज लेखाधिकारी कार्यालय,सांगली येथे जमा केलेला होता. सदर कार्यालयातील लेखाधिकारी श्री जाधव व कनिष्ठ लिपीक श्री कोळी, यांनी त्यांचेकडे निवडश्रेणी व वेतनश्रेणीचे काम पुर्ण करुन देण्यासाठी पाच हजार रुपये लाचेची मागणी करत असलेची तक्रार दि.५.८.२०२१ रोजी दिलेली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०५.०८.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री. कोळी, कनिष्ठ लेखापरिक्षक, सांगली यांनी निवड श्रेणी व वरिष्ठ वेतनश्रेणी पडताळणी व स्टॅम्पींग करुन देणेकरीता पाच हजार रूपये लाचेची मागणी करून ५,०००/- रूपये घेवुन येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली कार्यालयातील अधिकारी व स्टॉफ यांनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, विजयनगर सांगली इमारतीमधील लेखाधिकारी लेखापरिक्षण पथक शिक्षण विभाग, सांगली कार्यालय या ठिकाणी सापळा लावला असता **श्री. बाबासो महादेव जाधव,लेखाधिकारी** लेखापरिक्षण पथक शिक्षण विभाग, सांगली (वर्ग-२) व **बबन रामचंद्र कोळी, कनिष्ठ लेखापरिक्षक**, लेखाधिकारी लेखा परिक्षण पथक,शिक्षण विभाग सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने **श्री. बाबासो महादेव जाधव,लेखाधिकारी** लेखापरिक्षण पथक शिक्षण विभाग, सांगली (वर्ग-२) व **बबन रामचंद्र कोळी, कनिष्ठ लेखापरिक्षक**, लेखाधिकारी लेखा परिक्षण पथक,शिक्षण विभाग सांगली यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. गुरुदत्त मोरे, पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार संजय कलकुटगी, अविनाश सागर, सलीम मकानदार, श्रीपती देशपांडे, संजय संकपाळ, भास्कर भोरे, प्रितम चौगुले, सिमा माने, विना जाधव, राधीका माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with CamScanner